महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - ४०० ००१
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३ (विस्तार - ३३९) ईमेल - dmer.cetit@maharashtra.gov.in

संवैशिवस/बंधपत्रित सेवा/ दि. 25.02.2025

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय/महापालिका वैद्यकीय महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय- Enforcing of the UG & Post PG One Year Mandatory Social Responsibility Service

संदर्भ- मा.मुख्यमंत्री कार्यालयाचे पत्र क्र. CM/Note/६७/२०२५ दिनांक-१६.०१.२०२५

वै.शि.व.औ.द्रव्ये विभागाचा शा.नि.क्र. एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शि-२ दिनांक ०८.०२.२००८ नुसार राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एमबीबीएस/पदव्युत्तर पदवी/अतिविशेषोपचार पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेतलेल्या व शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांने लगेच शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दलाची सामाजिक दायित्व सेवा पूर्ण करणे अनिवार्य आहे. अशी सेवा बजावण्यास कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्याच्याकडून दंड वसूल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयान्वये सामाजिक दायित्व सेवेची तरतूदीप्रमाणे बंधपत्रित सेवा पूर्ण केल्याबाबतची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, शासकीय/महापालिका वैद्यकीय महाविद्यालयांनी सामाजिक दायित्व सेवा पूर्ण केल्याबाबत वर्षनिहाय व अभ्यासक्रमनिहाय माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर २००८-०९ पासून आजपावेतो तसेच पुढे दरवर्षीप्रमाणे खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात यावी.

| महाविद्यालयाचे नाव - | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | एम.बी.बी.एस. आंतरवासिता पूर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या | सामाजिक दायित्व सेवा पुर्ण केलेल्या उमेदवारांची संख्या | दंड रक्कमेचा भरणा केलेल्या उमेदवारांची संख्या | वसूल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम |
| १. | | | | | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेली माहिती दरवर्षी अद्यावत करुन महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सादर करण्यात यावी. तसेच याबाबत महाविद्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत संचालनालयास वेळोवेळी अवगत करण्यात यावे.

Signed by
Ajay Sahebrao Chandanwale
Date: 25-02-2025 11:26:14
संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई